CMYK

हरतालिकाचा हा सण,
तुमच्या जीवनात नव चैतन्य आणो,
तुमच्या पती आणि परिवारचे सुकल्याण होवो,
व तुमच्या शरीर आणि आत्म्याला शुद्ध करो
अशी देवी हरतालिके ला प्रार्थना...
हरतालिकेच्या
भक्तीमय शुभेच्छा..!

दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
लक्ष महाराष्ट्र
नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.
▶ RNI No.MAHMAR/2019/79184
www.lakshamaharashtra.com
lakshamaha.dhule@gmail.com
lakshamaha.nsk@gmail.com
▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : ३२३ वा ▶ सोमवार दि. १८ सप्टेंबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

न्यूज कॉलम

भरधाव वाहन धडकेत एकाचा मृत्यू

धुळे । मेहरगावहून धुळ्याकडे येणाऱ्या भरधाव अल्टोने (एमएच ०४ सीएल ६८३८) धडक दिल्याने हिरामण कथ्यू मोरे यांचा गंभीर जखमी झाल्याने मृत्यू झाला. तसेच रवींद्र मुरलीधर भामरे व राकेश ज्ञानेश्वर भामरे (दोन्ही रा. मेहरगाव) जखमी झाले. मृत हिरामण मोरे यांच्यासह अन्य दोन, असे तिघे दुचाकीने प्रवास करताना मेहरगावपासून दोन ते तीन किलोमीटर अंतरावर या अपघातात सापडले, असे दीपाली हिरामण मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद आहे.

मनोज जरांगे पाटील रुग्णालयात दाखल

छत्रपती संभाजीनगर । मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी तब्बल १६ दिवस उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांना अखेर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एवढी दीर्घ काळ उपवास केल्यामुळे मनोज जरांगे पाटील यांची तब्येत खालावली आहे. त्यामुळे वैद्यकीय उपचार, तपासण्यांकरीता अंतरवाली सराटी येथून त्यांना रूग्णवाहिकेद्वारे छत्रपती संभाजी नगर येथील गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये येताना मनोज जरांगे पाटील यांचे ठिकठिकाणी मराठा समाजाकडून स्वागतही करण्यात आले.

पावसाची संततधार : थाळनेर-होळनांथे रस्त्यावरील पूल खचला

धुळे । प्रतिनिधी



धुळे जिल्ह्यात दोन दिवस पावसाची संततधार सुरु असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. नदी- नाल्यांना देखील पूर आले. या दरम्यान शिरपूर तालुक्यातील थाळनेर-होळनांथे रस्त्यावरील पूल रात्रीच्या वेळी खचला. यामुळे पुलावरील वाहतूक खोळंबली आहे.

धुळे जिल्ह्यासह परिसरात शनिवारी दिवसभर पावसाची संततधार सुरु होती. यामुळे नदी-नाल्यांना पूर आल्याचे पहावयास मिळाले. शिवाय तापी नदी व उपनद्यांच्या उगम स्थानाच्या पाऊस झाल्याने तापीला पूर आला आहे. तापी नदीचे बॅक वॉटर जाण्यासाठी शिरपूर तालुक्यातील थाळनेर- होळणांथे रस्त्यावर पूल उभारण्यात आला आहे. परंतु रात्रीच्या सुमारास पूल अचानक खचला आहे.

जिल्ह्यातील काही भागात कोरडवाहू कपाशी, भुईमूग, ज्वारी, बाजारी, तूर पिकांना या पावसाचा मोठा दिलासा मिळणार आहे; मात्र बागायती कपाशीला मात्र याचा फटका बसणार आहे. दुसरीकडे धुळे तालुक्यात संततधार पाऊस सुरु असला तरी अद्याप जोरदार पावसाची प्रतिक्षा कायमच आहे. त्यामुळे पिकांची वाढ खुंटली असल्याने या पावसाचा फारसा फायदा होणार नसल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. शिंदखेडा तालुक्यातील मालपूरसह सुराय, चुडाणे, कलवाडे, कर्ले, परसोळे, वैदाणे देवी परिसरात शनिवारी पहाटे तीन वाजेपासून संततधार पाऊस सुरू झाला. गल्लीबोळातून चांगलेच पाणी वाहून निघाले. यामुळे पशूंच्या चाराचा प्रश्न मार्गी लागणार आहे, तर कोरडवाहू कपाशी, भुईमूग, ज्वारी, बाजरी, तूर या पिकांना या पावसाचा मोठा दिलासा मिळणार आहे. बागायती कपाशीला मात्र याचा फटका बसला आहे. शेतकऱ्यांचा कपाशी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात लागवड झाली आहे अशा शेतकऱ्यांचा कापूस वेचणीवर आला आहे. तो या पावसाने ओलाचिंब होऊन खराब झाला आहे.

अरुणावती पुल पाण्याखाली बुडाला

शिरपूर तालुक्यातील बाळदे आणि जातोडे गावादरम्यान असलेला अरुणावती पुल पाण्याखाली बुडाला आहे. वेचणीला आलेला कापुस पिकांसह ईतर शेती पाण्यात बुडाल्याने शेतकरी संकटात सापडले आहेत. तर काही दिवसांपासून कोरडीठाक पडलेल्या अरुणावतीला रात्रीतून मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने बाळदे जातोडे परिसरातील नागरिकांनी पाणी बघण्यासाठी गर्दी केली होती. महसूल प्रशासनाच्या पथकाने सकाळी बाळदे, जातोडे बनावल परिसरात प्रत्यक्ष भेट देत माहिती जाणून घेतली आहे.

तापी नदी धोक्याच्या पातळीवर

हतनूर धरणातून होणारा पाण्याचा विसर्ग लक्षात घेऊन प्रशासनाच्यावतीने नदी काठावरील गावांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. नंदुरबार जिल्ह्यातल्या तापी नदी काठावरील गावांना जिल्हा प्रशासनाच्या वतीने सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे तापी नदीला या वर्षाचा सर्वात मोठा पूर आला असून प्रकाशा गावाजवळ १११ मीटर ला तापी नदीची धोक्याची पातळी आहे.

सुदैवाने दुर्घटना नाही

थाळनेर- होळनांथे रस्त्यावरील पूल सकाळी खचलेल्या अवस्थेत आढळून आला आहे. परिसरात अधून मधून पाऊस सुरू असून काही महिन्यांपूर्वीच या रस्त्याचे काम झाले असल्याचे सांगण्यात येत आहे. पुल खचल्याने वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला आहे. पुलावरून नेहेमीच वाहनांची वर्दळ सुरू असते. परंतु त्यावेळी सुदैवाने वर्दळ नसल्याने कुठलीही घटना घडली नाही. सध्या वाहतुकीसाठी हा मार्ग बंद करण्यात आला आहे.

चांदवड तालुक्यात मुसळधार पाऊस

नाशिक जिल्ह्यात सर्वदूर होत असलेल्या पावसामुळे दुष्काळाने होरपळेल्या बळीराजा पावसाने सुखावला आहे. चांदवड तालुक्यातील पश्चिम रट्ट्यातील वडनेर- भैरव, धोडंबे, हट्टी, पारेगाव, वडाळीभोई या गावांत मुसळधार पाऊस झाल्याने विनिती व पाराशर नद्यांना पूर आला आहे. काही दिवसांपुर्वी कोरड्या ठाक पडलेल्या नद्यांच्या पात्रातून पूर वाहत असल्याने बळीराजा आनंदीत झाला.

मृताच्या मालकीची मिळकत बेकायदेशीरित्या बळकावली

तत्कालीन नगर भूमापन अधिकारीसह तिघांवर गुन्हा

धुळे । प्रतिनिधी

मृत व्यक्तीच्या मालकीची मिळकत बळकवण्यासाठी बेकायदनीशीरपणे फेरफार नोंद मंजूर केल्याप्रकरणी तत्कालीन नगर भूमापन अधिकारी पंकज पवार याच्यासह तिघांविरुध्द धुळे शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला. या संदर्भात धुळे जिल्हा न्यायालयात कामकाज होऊन चौकशीचे आदेश दिले.

दत्ताराम बाबूलाल शर्मा (वय ६४, रा. ग्राम सांटा, पो. उम्मेदगड बांसी, पं. जोरा, जि. मुरैना, मध्यप्रदेश) यांनी न्यायालयात तक्रार दिली होती. त्यांचे मृत भाऊ राजकुमार बाबूलाल शर्मा यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील मिळकत (सिटी सर्व्हे नंबर १८१०) बळकवण्याच्या उद्देशाने कल्पना रमेश शुक्ल उर्फ कल्पना राजकुमार शर्मा हिने येथील तत्कालीन नगर भूमापन अधिकारी पंकज शिवदास पवार, परिरक्षण भूमापक राजेश रमणलाल लोहार यांच्याशी संगनमत केले. पात्र नसताना संबंधीत मिळकतीस कल्पना शुक्ल हिचे नाव लावले. नगर भूमापन कार्यालय धुळे येथे दाखल केलेल्या बनावट दस्तावेजच्या आधारे फेरफार केला. नगर भूमापन अधिकारी पंकज पवार, परिरक्षण भूमापक राजेश लोहार यांनी त्यांच्यावर बंधनकारक असलेली कायदेशीर कार्यवाही पार पाडली नाही. तसेच त्यांनी त्यांच्या पदाच्या अधिकार असलेल्या चौकटी बाहेर जाऊन फेरफार नोंद मंजूर केली. या नोंदीनुसार कल्पनाचे नाव संबंधित मिळकतीच्या उताऱ्यावर बेकायदेशीररित्या लावले, अशी तक्रार दाखल झाल्यानंतर त्यावर न्यायालयात कामकाज झाले. न्यायालयाने या संदर्भात आदेश पारित केल्यानंतर धुळे शहर पोलीस ठाण्यात वरील तिघांविरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला. शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. फिर्यादीतर्फे अँड. सागर एस जैन यांनी कामकाज पहिले. पंकज पवार व लोहार यांचे विरुद्ध जिल्हाधिकारी यांचे आदेशाने देखील विभागीय चौकशी करण्याचे आदेश पारित झाले आहेत.

दुष्काळामुळे आ.पाटील यांचा वाढदिवस शुभेच्छा कार्यक्रम नाही

शेतकर्यांच्या पाठीशी उभे रहावे-आ.कुणाल पाटील

धुळे । प्रतिनिधी

जिल्हयात सर्वत्र दुष्काळी स्थिती आहे, शेतकरी चिंतेत असतांना वाढदिवस उत्सव साजरा करणे योग्य होणार नाही. त्यामुळे आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व सदिच्छा कार्यक्रम होणार नाही. त्याअनुषंगाने आ.कुणाल पाटील हे आज दि.१८ सप्टेंबर रोजी धुळ्यात उपलब्ध नाहीत. महाराष्ट्रासह जिल्हयात दुष्काळाचे भीषण संकट उभे आहे. बळीराजा संकटात सापडला आहे. अशी परिस्थीती लक्षात घेता वाढदिवसासारखा समारंभ करणे औचित्याला धरुन होणार नाही. त्यामुळे आ.कुणाल पाटील यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छांचा कार्यक्रम करणे योग्य होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यापार्श्वभूमीवर आ.कुणाल पाटील हे आज धुळ्यात नसल्याचे कळविले आहे. दरम्यान काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वाढदिवस उत्सव टाळून दुष्काळाच्या संकटात शेतकर्यांशी खंबीरपणे उभे रहावे असे आवाहन आ.कुणाल पाटील यांनी केले आहे.

धुळ्याच्या महिलेची ऑनलाइन फसवणूक; २ लाख २६ हजार घेतले परस्पर काढून

धुळे । प्रतिनिधी

बँकेतून मॅनेजर बोलत असल्याची बतावणी करून महिलेच्या बँक खात्यातून २ लाख २६ हजार २९८ रुपये परस्पर काढून घेण्याचा प्रकार समोर आलेला आहे. आपली फसगत झाल्याचे लक्षात येताच सायबर पोलिस ठाण्यात शनिवारी सायंकाळी गुन्हा दाखल झाला. फसवणुकीचा हा प्रकार शुक्रवारी दुपारी पाऊण वाजेच्या सुमारास घडला.

देवपुरातील वलवाडी येथील इंद्रप्रस्थ कॉलनीत राहणाऱ्या वृषाली महारू पाटील (वय २७) या महिलेने फिर्याद दाखल केली. त्यानुसार, शुक्रवारी दुपारी वृषाली पाटील या घरी असताना त्यांना एक फोन आला. आयडीएफसी बँक शाखा पिंपरी, चिंचवड पुणे येथून मॅनेजर बोलत असून तुमच्या खात्यातून यूपीआय अर्थात ऑनलाइन प्रणालीद्वारे ५० हजार रुपये विड्रॉल करण्यासाठी तीन वेळा विनंती आलेली आहे.

सदरची विनंती आम्हाला काहीतरी फसवणूक वाटत आहे. सदरची विनंती तुम्ही केलेली आहे का, अशी विचारणा करण्यात आली. यावर वृषाली यांनी आपण कोणतीही विनंती केली नसल्याचे स्पष्ट केले. यानंतर हे बँक खाते महिलेच्या परवानगीने ब्लॉक करण्यात आले. त्यानंतर वृषाली यांच्या मोबाइल फोनवर थोड्याच वेळात त्यांच्या वेगवेगळ्या बँक खात्यातून २ लाख २६ हजार २९८ रुपये कोणीतरी अज्ञात व्यक्तीने परस्पर काढून घेतल्याचे मॅसेज प्राप्त झाले. यावर बँक खात्याशी संबंधित असलेल्या माहितीच्या आधारे बँक खात्यातून ऑनलाइनद्वारे पैसे परस्पर काढून फसवणूक केल्याचे समोर येताच महिलेने सायबर पोलिस ठाणे गाठत शनिवारी सायंकाळी सव्वासात वाजेच्या सुमारास फिर्याद दाखल केली. घटनेचा तपास पोलिस निरीक्षक धनंजय पाटील करीत आहेत.

बाप्पांची मिरवणूक

विघ्नहर्ता गणरायाचे आगमन १९ सप्टेंबरला होणार आहे. आगमनाला अद्याप एक दिवस शिल्लक आहे. त्यापूर्वीच पेठ विभागाचा महाराजा मरिमाता ग्रुपतर्फे गणरायाच्या आकर्षक मूर्तीची शहरातून सवाद्य जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली.

स्वच्छता अभियानात सर्वांनी योगदान द्यावे

जिपच्या सीईओ आशिमा मित्तल यांचे आवाहन

नाशिक । प्रतिनिधी

स्वच्छता ही खरोखर सेवाच असून प्रत्येकाने स्वतःपासून संपूर्ण स्वच्छतेचा संकल्प केल्यास प्रत्येक गाव, शहर स्वच्छ व सुंदर होणार आहे. स्वच्छतेच्या चळवळीत लोकसहभाग अतिशय महत्वाचा घटक असून स्वच्छता अभियानात सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

स्वचछ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत देशभरात १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता ही सेवा मोहीम राबविण्यात येत असून काल जिल्हयात सर्व ठिकाणी श्रमदान मोहिम राबवून सेवा दिवस साजरा करण्यात आला. नाशिक तालुक्यातील गोवर्धन ग्रामपंचायतीमध्ये जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी आशिमा मित्तल यांच्या उपस्थितीत श्रमदान मोहिम राबविण्यात आली.

यावेळी पुढे बोलताना आशिमा मित्तल यांनी प्रत्येकाने स्वच्छतेचा संकल्प केल्यास व स्वच्छतेची सवय लावून घेतल्यास गाव स्वच्छ व सुंदर होण्यास मदत होणार आहे. सिंगल युज प्लास्टिकचा वापर कमी करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

प्रास्ताविकात बोलताना पाणी व स्वच्छता विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी दिपक पाटील यांनी स्वच्छता ही सेवा उपक्रमात राबविण्यात येणा-या विविध उपक्रमांची माहिती देताना कचरामुक्त भारत करण्यासाठी सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास गटविकास अधिकारी सोनिया नाकोडा, सरपंच गोविंद डंबाळे, उपसरपंच बाळासाहेब लांबे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर गाडे, दत्तु डंबाळे, गोविंद बेंडकुळे, बापू डंबाळे, नंदा वायचळे, रत्ना मधे, लंकाबाई बदादे, प्रकाश खैरनार, माजी सरपंच प्रल्हाद जाधव, सोनवणे, तालुकास्तरीय खातेप्रमुख, गटसमन्वयक, समुह समन्वयक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, बचतगट सदस्य, गावस्तरीय कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.


हार्दिक अभिष्टचिंतन!
धुळे जिल्ह्याचे पाणीदार नेते
मा.आमदार बाबासाहेब कुणालजी पाटील
आमदार : धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघ
कार्याध्यक्ष : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री.शशिकाका रंवदळे

हार्दिक अभिष्टचिंतन!
अक्कलपाडा धरणाचे जनक
धुळे जिल्ह्याचे पाणीदार नेते
मा.आमदार बाबासाहेब कुणालजी पाटील
आमदार : धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघ
कार्याध्यक्ष : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघ, धुळे
सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, धुळे तालुका

दिल्लीत की गल्लीत?

कोणत्याही सुदृढ लोकशाहीचा प्रवास दोन अंगांनी होत असतो. पहिले अंग म्हणजे, राज्यघटना आणि विविध प्रकारचे कायदे यांच्या चौकटी अधिकाधिक न्यायोचित, सर्वहितैषी आणि लोकाभिमुख होत जाणे. लोकशाहीच्या प्रवासाचे दुसरे अंग अधिक सूक्ष्म, पोक्त आणि तिचे सौंदर्य वाढविणारे असते. ते परंपरा आणि पायंड्यांचे सर्वांनी मिळून जिवापाड जतन करण्याचे असते.

लोकशाही 'आदर्श' बनविण्यासाठी नवनवीन कायदेकानूंचा, नियमावल्यांचा आणि कामकाज प्रक्रियांचा मारा करणे तुलनेने सोपे असते. या उपायांची दृश्यमानता तात्कालिक परिणाम करणारीही असते. मात्र, एकेका समंजस, शहाण्या पावलाने लोकशाहीचे रिवाज मजबूत करत जाणे; हे लोकशाहीच्या सर्वच स्तंभांचे काम असते. त्यांची ती नैतिक जबाबदारी असते. कोणत्याही खटल्यात दोषी ठरणाऱ्या नेत्यांवर आजीवन बंदी घालावी, ही सर्वोच्च न्यायालयाने नेमलेले न्यायमित्र म्हणजे ॲमिकस क्युरी यांनी केलेली शिफारस म्हणजे सर्वोच्च न्यायालय उद्या कशा प्रकारचा निर्णय घेऊ शकते, याचे सूचन आहे. हा अहवाल म्हणजे वाट्टेल त्या गुंड, गुन्हेगार आणि संशयास्पद चारित्र्य असणाऱ्या कार्यकर्त्यांना बेलाशक उमेदवाऱ्या देणाऱ्या सर्वच राजकीय पक्षांनी निर्लज्जपणाची कशी हद्द गाठली आहे, याचे दिग्दर्शन आहे. सध्या न्यायालयात दोषी ठरणाऱ्या राजकीय नेत्यांवर प्रतिनिधीगृहात जाण्यासाठी सहा वर्षांची बंदी आहे. हा कालावधी संपला की या नेत्यांनी पुन्हा निवडून सभागृहात जावे किंवा नाही, हा यातला प्रश्न आहे. या संबंधी न्यायालयात आलेली याचिकाही नेमका हाच प्रश्न उपस्थित करणारी आहे.

या प्रकरणातली मूळ याचिका ॲड. अश्विनीकुमार उपाध्याय यांनी बऱ्याच काळापूर्वी केली आहे. तीत दोन मुख्य मुद्दे होते. पहिला, न्यायालयाने दोषी किंवा गुन्हेगार ठरविलेल्या नेत्यांना निवडणूक लढविण्यास आजीवन बंदी करणे आणि दुसरा, लोकसेवकांच्या विरोधात भरला गेलेला प्रत्येक खटला एका वर्षाच्या आत निकाली निघण्यासाठी देशभरात विशेष न्याययंत्रणा उभी करणे. सध्या एखादा सरकारी कर्मचारी किंवा अधिकारी दंड संहितेच्या कलमांखाली गुन्हेगार ठरला आणि त्याला शिक्षा झाली तर त्याची नोकरी कायमची जाते. बहुतेकदा अशांना निवृत्तिवेतनही नाकारले जाते. असे असताना लोकप्रतिनिधींना वेगळा न्याय का, असा सवाल याचिकेत होता. तो न्यायमित्रांनी उचलून धरला आहे. अशा प्रकारच्या गुन्हेगारांना संसदेत किंवा विधिमंडळात आणून बसविणे म्हणजे या सभागृहांचे कायदे करण्याचे मुख्य, प्राथमिक कामच दूषित करण्यासारखे आहे; असाही युक्तिवाद याचिकेत होता. तोही पटण्यासारखा आहे. ज्या कायद्यांची पत्रासच ज्यांनी ठेवली नाही; त्यांनीच कायदेमंडळात जाऊन नवे कायदे करावेत; हा संसदीय लोकशाहीमधला मोठाच अंतर्विरोध आहे. तो दूर करण्यासाठी आजीवन बंदी हवी, ही मागणी चूक नाही.

संसदीय लोकशाही निकोप करण्याच्या दृष्टीने पाहिले तर ही याचिका तसेच न्यायमित्रांचा अहवाल तर्कशुद्ध वाटतो. यात सर्वोच्च न्यायालय काय ते पाऊल टाकेलच. सध्याचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड ज्या पद्धतीने कारभार करीत आहेत; तो पाहता न्यायमित्रांच्या शिफारसी मान्य झाल्या तर आश्चर्य वाटायला नको. मात्र, एवढ्याने हा प्रश्न किंवा अंतर्विरोध संपेल, असे कुणाला वाटत असेल तर तो भ्रम आहे. यातली प्रमुख जबाबदारी राजकीय पक्षांची आहे. त्यांनी स्वतःहूनच गुन्हेगार, दोषी किंबहुना संशयास्पद चारित्र्याच्या उमेदवारांना निवडणुकांच्या रिंगणात उभेच करता कामा नये. अर्थात, राजकीय पक्षांवर ही जबाबदारी टाकून नागरिक आणि मतदारांना मोकळे होता येणार नाही. आज माध्यमांचा विस्तार इतका झाला आहे की, कोणत्या मतदारसंघातला कोणता उमेदवार कलंकित, गुन्हेगारी पार्श्वभूमीचा आहे, हे लपून राहात नाही. मतदारांना ते एरवीही बरोबर माहीत असते. मग अशा उमेदवारांना नागरिक मते का देतात? एखाद्या चिन्हाशी किंवा पक्षाशी असणारी मतदारांची बांधिलकी ही चौकट ओलांडून विस्तृत का होत नाही? लोकशाहीच्या आरोग्यासाठी मतदारच अशा उमेदवारांना धडा का शिकवत नाहीत? उद्या सर्वोच्च न्यायालयाने अशा उमेदवारांवर बंदी आणली आणि त्यांनी आपापल्या घरातल्या निरपराध सदस्यांना मुखवटा म्हणून उभे केले; तर निवडणूक आयोग किंवा न्यायालय तरी काय करू शकणार आहे? तेव्हा, हा प्रश्न केवळ एखादा कायदा करून किंवा कुणावर बंदी आणून सुटणारा नाही, हे सर्व संबंधितांनी लक्षात ठेवणे गरजेचे आहे. सात दशकांच्या वाटचालीत आपण नुसतेच कायद्यांचे जंगल उभे करण्यावर जरा जास्तच भर दिला आहे.

वारशाचा अभिमान जागृत करणारं नेतृत्व 'नरेंद्र मोदी'

'भारत हा काही भूमीचा तुकडा नाही, पुराणपुरुष आहे.. असं भारताचं श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांनी वर्णन केलं होतं ५००० वर्षाहून अधिक समृद्ध वारसा या भारत भूमीचा आहे.शेकडो संस्कृती इथं नांदल्या,अनेक धर्म, पंथ या भूमीत उदयास आले. भारता ईतका प्राचीन वारसा असलेला देश खचितच या जगाच्या पाठीवर असेल. जगभरामधले पर्यटक, श्रद्धाळू अभ्यासक याबाबत जाणून घेण्याच्या ओढीने हा समृद्ध वारसा अनुभवण्याच्या साठी गेली हजारो वर्ष या भूमी च्या ओढीनं येत आहेत. मा.नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी आजवरच्या राज्यकर्त्यांनी दुर्लक्ष केलेल्या सांस्कृतिक वारसा स्थळांचा विकास करण्याचा निश्चय केला. आपला वारसा आपण जगासमोर मांडला पाहिजे त्या माध्यमातून भारताची महानता अधिक चांगल्या पद्धतीने जागतिक पातळीवर गेली पाहिजे येणाऱ्या लोकांना चांगल्या सुविधा मिळायला पाहिजेत आपण आपला सांस्कृतिक वारसा जतन करून तो पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी पर्यटन स्थळी पायाभूत सुविधांचा विकास केला पाहिजे.

या विचाराने देशातील ५०० पेक्षा जास्त पर्यटन स्थळं ३१ राज्य आणि १५ संकल्पनांवर आधारित सर्किटचा विकास मोदी सरकारने सुरू केला आपल्या या महान वारशाचे मार्केटिंग योग्य त्या सोयीसुविधा विकास केल्याशिवाय त्या जागतिक पटलावर अधिक ठळकपणे दिसणार नाही हा मोदीजींचा विचार पंतप्रधान झाल्यावरचा नव्हता तर ते गुजरातचे मुख्यमंत्री असल्यापासूनच आपल्या राज्यात असणाऱ्या जागतिक महत्त्वाच्या वारशाचे संस्कृतीक, धार्मिक पर्यटन वाढवण्यासाठी महत्त्वाचे प्रयत्न केले. मोठे उद्योग, लघुउद्योग, आयटी यासारखे उद्योग वाढवण्याबरोबरच गुजरातचा वारसा जागतिक पटलावर आणण्याकरता पायाभूत सुविधांच्या सोबत त्या परिसरातील त्या प्राचीन वास्तु, संस्था ठिकाण यांचा विकास केला उदाहरणादाखल गुजरातच्या अतिशय आतल्या भागात असलेल्या जुनागड पर्यंत उत्तम सहा पदरी रस्ते त्यावेळी मोदींनी बांधले.जुनागडच्या नवाबाने बांधलेलं सक्करबाग हे प्राणी संग्रहालय अतिशय प्रसिद्ध होतं पण हळूहळू त्याची राया गेली मोदीजी गुजरातचे मुख्यमंत्री असताना या बागेच १५० व वर्ष अतिशय सुनियोजित पणे मोठ्या प्रमाणावर साजरा करून ते संग्रहालय पुन्हा नव्या झळाळीला आणल अनेकांनी जुनागडच्या सक्करबाग प्राणीसंग्रहालयाचा झालेला कायापालट पाहून अविश्वसनीय बदल अशी प्रतिक्रिया नोंदवली वाघ, सिंह, हिप्पोपोटोमस, शहामृग अनेक दुर्मिळ प्राणी, पक्षी स्वच्छ आणि सुंदर वातावरण या ठिकाणी निर्माण करून पुन्हा या प्राणी संग्रहालयाला उर्जित अवस्था आणली गुजरातच्या गीर भागामध्ये आढळून येणाऱ्या दुर्मिळ आशियाई सिंहांचं गीर अभयारण्य जागतिक पातळीवर मार्केटिंग करून जगाच्या नकाशावर असं आणलं की लोक जगभरातनं गीरचा अभयारण्य आणि तिथला सिंह पाहायला येऊ लागले 'खुशबू गुजरात की' असं सांगत 'कुछ दिन तो गुजारो गुजरात में'असे म्हणणारे अमिताभ बच्चन आणि अनेक महत्त्वाचे सितारे जेव्हा गुजरातच्या पर्यटनाचे मार्केटिंग करू लागले तेव्हा जगाची पावलं आपोआपच गुजरात कडे वळली. मोदीजी मुख्यमंत्री असतानाची ही दोन यशस्वी उदाहरणे ते पंतप्रधान झाल्यावर देशांमध्ये बौद्ध सर्किट, रामायण सर्किट, समुद्रकिनारे सर्किट,मरुस्थळ सर्किट, इको सर्किट, वारसा स्थळे सर्किट, हिमालय सर्किट, कृष्ण सर्किट,उत्तर पूर्व सर्किट, ग्रामीण सर्किट, आध्यात्मिक सर्किट, तीर्थंकर सर्किट, आदिवासी सर्किट, वाईल्ड सर्किट, अशा १५ संकल्पनावर आधारित सर्किटचा कालबद्धरीत्या विकास करायचा निर्णय मोदी सरकारने घेतला. देशामधल्या महत्त्वाच्या सांस्कृतिक स्थळांचा जसे अयोध्या, काशी विश्वनाथ कॉरिडोर, केदारनाथ धाम, सोमनाथ,या ठिकाणी केलेला विकास झालेला अमुलाग्र बदल केलेलं वारशाचे जतन पाहताना नरेंद्र मोदी या लोकनेत्याची दूरदृष्टी लक्षात येते. या वेगवेगळ्या १५ सर्किट मुळे पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे. जगात भारताची ओळख बुद्धाचा देश अशी आहे बौद्ध संस्कृतीचा समृद्ध प्राचीन वारसा भारताने प्राणपणाने जपला. जगामधले अनेक देश आज बौद्ध आहेत आपण काशीयात्रा करतो तशी एकदा तरी गयेची यात्रा व्हावी अशी प्रत्येक बौद्ध धर्मीयाची इच्छा असते. भगवान बुद्धांना देशभरामध्ये विहार करत शांतीचा संदेश दिला. हे बौद्ध सर्किट बोधगया, सारनाथ, कुशीनगर, वैशाली, राजगीर, श्रावस्ती, लुंबिनी असे आहे. जुलै २०१४ मध्ये या बौद्ध सर्किट ची घोषणा झाल्यानंतर पर्यटन व्यवसायातील जगभरातल्या पर्यटकांना आकर्षित करून पर्यटन उद्योग वाढवणे यासाठी एक महत्त्वाचं पाऊल समजून पर्यटन उद्योगाने याचा मोठा स्वागत केलं.बौद्ध तीर्थस्थळ विकासाची मोठी आवश्यकता होती. जगभरामधल्या पर्यटकांना भारतातील इतर राज्य जसं अरुणाचल प्रदेश मधल्या बोडमिल, तवांग सिक्कीम मधल्या कालिपोंग आणि रुमेक जम्मू काश्मीर मधल्या लडाख हर्बन आमराणी आणि परीहासपूर, हिमाचल प्रदेशा मधल्या स्पीती, किन्नर, धर्मशाळा, हरियाणा मधल्या सुख यमुनानगर, असांग महाराष्ट्रा मधल्या कार्ला,कान्हेरी,अजिंठा-वेरूळ, पितळखोरा, नाशिक इथल्या गुफा.पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग आणि कलकत्ता आंध्र प्रदेशमधल्या अमरावती, शाली होंडा, बोरा गुफा आणि नागार्जुन कोंडा येथील गुंफा अशा विविध स्तूप, गुंफा, विहार या ठिकाणी जायची इच्छा असूनही पायाभूत सुविधा नसल्याने हवाई मार्गाने हे ठिकाण जोडली नसल्याने, इच्छा असूनही जाता येत नव्हतं. अशा परिस्थितीत मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वाखाली सुरुवातीच्या बौद्ध सर्किटमध्ये पाच पर्यटन केंद्र जोडण्याकरता तातडीने ५०० कोटी रुपयांचा निधी दिला गेला. याचा परिणाम म्हणजे जवळपास १६ राज्यांमधून आणि जगातील ३० हुन अधिक देशांमधले पर्यटक आता या ठिकाणी नव्याने येऊ लागले आहेत. या १५ सर्किटपैकी दुसरे उदाहरण आपण 'रामायण सर्किटचं' घेऊया भगवान प्रभू रामचंद्र हा या देशाचा आत्मा आहे. रामायण ज्या-ज्या ठिकाणी घडलं ती ठिकाण आजही अस्तित्वात आहेत अनेक दशकं ती दुर्लक्षित होती. जगामधल्या अनेक देशांची धर्माने मुस्लिम-बौद्ध असूनही रामायण ही अस्मिता आहे.पण ज्या देशाने जगाला प्रभू श्रीराम दिला याच देशात प्रभू रामाचा हा वारसा दुर्लक्षित होता. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या पुढाकाराने केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने नऊ राज्यांमधल्या १५ ठिकाणांची रामायण सर्किट करता निवड केली आहे.त्याकरता बौद्ध सर्किट प्रमाणेच ही सगळी शहर रेल्वे, रस्ते आणि हवाई मार्गे एकमेकांशी जोडली जाणार आहेत.

मोदीजींनी नेपाळचे पंतप्रधान पुष्प कुमार दहल यांच्याशी भेट घेऊन नेपाळला देखील या रामायण सर्किटमध्ये समाविष्ट करून घेतले. उत्तर प्रदेश मधील अयोध्या,शृंगमेर पूर, नंदिग्राम, चित्रकूट बिहार मधील सीतामढी, बक्सर, दरभंगा या प्रोजेक्टमध्ये आहेत. मध्य प्रदेशामधील चित्रकूट छत्तीसगडमधील जगदलपूर,ओडिसा मधील महेंद्रगिरी, दक्षिणेच्या राज्यातील तेलंगणा मधील भद्राचलम, तामिळनाडू रामेश्वरम, कर्नाटकच हम्पी रामायण सर्किट चा हिस्सा आहे. महाराष्ट्रातील नाशिक आणि नागपूर या शहरांचाही यात समावेश करण्यात आला आहे. या रामायण सर्किटमध्ये निवडण्यात आलेल्या पंधरा शहरातल्या ज्या ठिकाणी विमानतळ नसेल त्या ठिकाणी विमानतळाच निर्माण केलं जाईल. सर्व शहरांना राष्ट्रीय महामार्गाने जोडले जाईल.या १५ शहरांमध्ये पर्यटक, भाविकांसाठी जागतिक पातळीवरच्या सुविधा देण्याकरता, इथला वारसा जपण्याकरता मोठ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. देशामधल्या त्यामध्ये लोकांचा विशेषता महाराष्ट्राचं कुलदैवत असलेल्या काशी विश्वेश्वराच्या कॉरिडॉरचा देखील अशाच पद्धतीने निर्माण करून देशाला अर्पण करण्यात आल. पंतप्रधानांच्या लोकसभा मतदारसंघात असलेल्या काशी विश्वनाथ कॉरिडॉरचा लोकार्पण सोहळा जेव्हा जगानं पाहिला तेव्हा एवढ्या कमी कालावधीत इतकं नियोजित काम उभं राहू शकतं यावर अनेकांचा विश्वास बसत नव्हता. हा वारसा जपण्याकरता इथली अतिक्रमण हटवण्यात आली तेव्हा छोटी-मोठी ३०० नवी मंदिर उजेडात आली.आणि इथला वारसा अधिक ठळकपणे जगाच्या समोर आला. वर उल्लेखलेली १५ सर्किट्स आकाराला आल्यानंतर देशभरात, जागतिक पातळीवरती पर्यटन वाढीचा वेग अभुतपूर्व असेल यात शंका नाही. यापैकी अनेक सर्किटचं काम ५०% वरून अधिक पूर्ण झाला असून त्यासाठी भरघोस निधी देऊन हा वारसा जतन करण्याबरोबरच त्याचा संवर्धन करण्याकडे ही मोदीजींनी विशेष लक्ष दिले आहे.मोदीजी ज्या-ज्या राज्यात जातात त्या राज्यामधला वारसा देशापुढे आणण्याचा प्रयत्न करतात. याची अनेक उदाहरणं आपल्यासमोर आहेत नीट सुविधा नसल्यामुळे आरामदायी प्रवास नसल्यामुळे इच्छा असूनही अनेक जण धार्मिक सांस्कृतिक व इतर पर्यटन टाळताना दिसत, मात्र या वारसा संवर्धनामुळे ३१ राज्यांमधील ५०० हून अधिक पर्यटन स्थळ नव्यानं देशासमोर येणार असून, देशामधल्या केदारनाथ धाम, बद्रीनाथ धाम, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या ठिकाणी असलेल्या धार्मिक वारशाच्या जाणाऱ्या रस्त्यांची स्थिती बदलल्यामुळे त्या ठिकाणी मोठ्या पर्यटन वाढल्याचे चित्र आज दिसत आहे.ज्या मंदिराच्या समृद्धीमुळे मोहम्मद गजनी सारख्या परकीय आक्रमकांनी २१ वेळा या मंदिराची लूट केली, त्या पवित्र सोमनाथमंदिरास विकासाच्या यादीत अग्रक्रम देऊन इथला वारसा जपण्याला प्राधान्य दिल्याने, गेल्या काही वर्षात तिथलाही पर्यटनाचा आलेख कमालीचा उंचावला आहे. राम जन्मभूमी न्यासाकडून आयोध्या येथिल प्रभू श्रीरामाच्या मंदिराचा निर्माण कार्य अतिशय वेगाने सुरू आहे.आयोध्या आणि फैजाबाद परिसरामध्ये प्रभू श्री रामचंद्राच्या राजधानीतील वारशाच शरयूच्या घाट विकासाकडे मोदीजी वैयक्तिक लक्ष देत आहेत.श्री राम मंदिराच्या निर्माणा नंतर इथल्या वारशाचा जतन करण्याकरता त्याचाही सांस्कृतिक स्थळांच्या विकास यादीत समावेश केल्याने,आगामी काळात जगातील पर्यटकांचा सर्वाधिक ओढा असलेल्या वारसा स्थळांच्या यादीत राम मंदिराचा समावेश असेल. वाराणसी मधील गंगा आरती असेल किंवा आयोध्यातील शरयू ची आरती हा वारसा जागतिक महत्त्वाच्या पाहुण्यांपर्यंत पोहोचवून त्यांना देखील या ठिकाणी आमंत्रित करण्याच्या माननीय नरेंद्र मोदीजींच्या कृतीमुळे या ठिकाणच्या पर्यटन वाढीला देखील चालना मिळाली आहे. आपला वारसा जतन करणं तो अभिमानाने मिरवण हे आपण केलं तरच जग त्याच अनुकरण करेल असं सांगताना भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी काळामध्ये अमृत काळचे पंचप्राण म्हणून आपल्या वारशाचा अभिमान, गुलामगिरीच्या प्रत्येक पैलू पासून मुक्तता, एकता आणि एकजूट, नागरिकांमध्ये कर्तव्याची भावना विकसित करण्याचे भारताचे उद्दिष्ट मोदीजींनी ज्या गोष्टींना अग्रक्रम दिला त्यात आपल्या वारशाचा अभिमान हा महत्त्वाचा भाग आहे.२०१४ पासून आतापर्यंत २३१ अनमोल प्राचीन मूर्ती भारतात परत आणण्यात मोदी सरकारला यश आल आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखें जी शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा वारसा आहेत तसेच शिवाजी महाराजांची जगदंबा तलवार हा वारसा भारतात परत आणण्यासाठी देखील माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रोत्साहनामुळे परराष्ट्र मंत्रालयाच्या सहकार्याने महाराष्ट्र सरकारचे ज्येष्ठ मंत्री सुधीर भाऊ मुनगंटीवार हे प्रयत्न करतायेत, लवकरच त्याला यश येऊन वाघ नखे महाराष्ट्रात दाखल होणार आहेत छत्रपती शिवरायांच्या दोन वस्तूंचा उच्चार केला तरी अंगावरती रोमांच उभा राहतो, असा हा आपला पराक्रमाचा वारसा, पर्यटन त्या भागामधल्या सर्वांगण विकासासाठी अतिशय आवश्यक असलेला घटक असल्यामुळे मोदीजी कायम याकडे अतिशय बारकाईने लक्ष देतात. या वारशाच जागतिक पातळीवरती मार्केटिंग करून लहानात लहान घटकापासून अगदी मोठ्या पातळीपर्यंत कमी कालावधीत अधिकाधिक आर्थिक उन्नती करून देणारा पर्यटन व्यवसाय हा वारसा जपून वाढू शकतो हे गुजरात मॉडेलच्या माध्यमातून देशासमोर आणणाऱ्या मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी प्रत्येक गोष्टीत आपला वारसा जपून भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे १५ ऑगस्ट २६ जानेवारी या राष्ट्रीय सणांच्या दिवशी पारंपारिक पोशाख फेटा बांधून वारसा जपणाऱ्या पंतप्रधानांना पाहिल्यावर भारतीयांची छाती अभिमानाने फुलून येते. आजवर पाश्चात्य पोशाख करून संस्कृतीचा अंधानुकरण करून आपले नेते त्यातच धन्यता मानत होते.आपल्या वारशाची ताकद जगाला दाखवून देणाऱ्या मोदीजींमुळे अनेक राष्ट्राध्यक्ष पंतप्रधान भारतीय पोशाख करून स२० परिषदेला आले, यातच भारतीय वारशाचा पुरस्कार करणाऱ्या मोदीजींचा आणि भारताचा विजय समस्त भारतीयांना दिसला. जी २० परिषदेत अस्सल देशी भाषेत भाषण करून आपला वारसा जपणाऱ्या पंतप्रधानांना पाहून देशो-देशीच्या राष्ट्राध्यक्ष,पंतप्रधानांना अस्सल भारतीय वारशाच्या भेटवस्तू देऊन, भारतीय बोली, भारतीय खानपान, भारतीय परंपरा, भारतीय संस्कृती, अस्सल भारतीय वारशाचा पुरस्कार करणारा या वारशाचा अभिमान बाळगणारे पहिलेच असे पंतप्रधान या देशाला लाभले,अनेक बाबीत जगाचा नेता असणाऱ्या भारताच्या वारशाची ताकद मोदीजींनी देशवासीयांना दाखवून दिली. आता हाच वारसा जपून भारताच्या विकासाचा वेग प्रत्यक्ष वाढवता येतो, हे लक्षात आल्यानंतर तरी पाश्चातत्यांच अंधानूकरण करणारे काही भारतीय आपल्या वारशाची ताकद ओळखतील अशी आशा आहे. या वारशाच्या ताकदीची भारतीयांना ओळख करून देणाऱ्या लाडके पंतप्रधान माननीय मोदीजींना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

अजित चव्हाण
सह मुख्य प्रवक्ता,भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश
बुद्धिजीवी प्रकोष्ट संयोजक, भाजपा, महाराष्ट्र

शब्दकोडे-१८१



आडवे शब्द

१. कृष्णाचा मित्र ६. जवळपास, सभोवती ९. ढीग ११. प्रत्येक वर्षी १३. रस्ता १४. देशातील किंवा राज्यातील प्रमुख शहर १६. दृष्टिभेट १९. पूर्ण भरतीची वेळ २०. नवा २२. पृथ्वी २३. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नसणे २६. प्रत्येक दिवशी, मजुरी २७. जास्त २९. लता, वेल ३०. टिंगल ३१. बोटाच्या टोकावर असते ते ३२. खरेदी ३४. जुने, ऐतिहासिक लेखन ३६. वटवट ३८. जबरदस्तीने (हिंदी) ४०. चेहऱ्याची निमुळती बाजू ४२. ज्वारीची रोटी ४४. माल ४५. हिंदीत कालवा ४६. भाकरी-पोळीचा पाव भाग ४८. अपऱ्या नाकाची ५०. बांबू ५२. आंब्याची पोळी ५४. मांडणी ५६. हिशोबात केलेला गोंधळ ५७. चक्र ५८. रामाचा एक भाऊ ५९. वजनदार ६०. व्यापारी ६१. राजकारणातील पवार, जोशी या मान्यवरांचे नाव ६२. अनुकंपा, करूणा ६३. स्तुतीस्तोत्र ६५. भांडण ६७. मागचे अंगण ६९. प्रत्यक्षात ७१. आशीर्वाद, वर ७३. परंपरागत गण वा संपत्ती ७४. शेत ७५. कावळा ७६. जनन ७७. बळी जाणारा ७८. काळ्या पाठीचे हरीण ७९. उत्तराधिकारी ८०. ताक कांुफ्कून पिणारा ८१. मल्याळी भाषिक राज्य ००

उभे शब्द

१. श्रीकृष्णाचे आयुध २. दरवाजा ३. मत्स्य ४. आटोपते घेणे, आवरणे ५. जोरजबरदस्ती ६. कुंभाराची भट्टी, स्त्री ७. काचेचे पात्र ८. मध्यम प्रमाण ९. कृष्णसखी १०. सुनील गावस्करलिखित एक पुस्तक १२. नम्र १५. शिल्लक १७. असे असल्यास १८. धूळ २१. फायदा २४. नाजूकपणा नसलेले, भडक २५. प्रौढ, जून २६. थेट, स्पष्ट २८. ताणले जाणारे ३३. निमंत्रक, कुटुंबप्रमुख ३५. खणणे ३७. माळी, बागवान ४०. अडथळा, प्रश्न ४१. दरारा ४२. नशीब ४३. घोड्यावरून फेरी ४७. काटेरी औषधी वनस्पती ४९. अगदी थोडे ५१. नम्रपणे झुकलेला ५२. उंट हाकणारा ५३. अकस्मात ५५. त्रैलोक्यात फिरणारा मुनी ५६. महासर्प ५९. संधी ६१. नगर ६२. डुक्कर, ऱ्हस्व उच्चाराने खेकडा ६४. सततची हालचाल ६६. पटकन ६८. रामदासांचा ग्रंथ ६९. बैलांचा सण, बेंदूर ७०. दरवाज्यावरचा आवाज ७२. दृष्टी ७४. माठ, गाडगे ७५. कारस्थान ७८. मृत्यू

शब्दकोडे १८० चे उत्तर

आडवे उत्तर

१.जरतर ५.अनुवादक ९.राजकुमार १२.वसाहत १३.चरणरज १४.नवीन १६.करवत १८.पाऊस २०.रसद २२.खरडपट्टी २४.सारा २५.कलमा २६.मधुर २८.मोल २९.तापट ३१.वरवर ३२.मदत ३४.साग ३६.वास ३७.कारण ३८.पराभूत ४०.कसाई ४१.कुरापत ४२.कळ ४३.तडीपार ४५.रव ४६.रपेट ४७.काल ४९.खण ५०.नवे ५२.पाप ५३.वाकडातिकडा ५५.जवळजवळ ५७.डमरू ५८.वश ५९.गल ६०.यमक ६२.सरळ ६३.जप ६४.कट ६५.विपरीत ६८.वाडवडील ७०.नकलाकार ७१.नुकसान ७४.पसाभर ७५.सतलज ७६.पड

उभे उत्तर

१.जवळपास २.रसा ३.तह ४.रतन ५.अननस ६.वाचक ७.दर ८.कणखर ९.राज १०.कुमार ११.रडतराऊत १५.वीरमाता १६.कट्टी १७.वसा १९.सकल २१.दमट २२.खरवस २३.डफ्फड २७.समर २८.मोगरा ३०.परकर ३३.दणकट ३४.सापट ३५.कातडी ३६.वाईट ३७अ.कातरवेळ ३९.भूतल ४१.कुरण ४४.पाचक ४७.कापडचोपड ४८.अतिशय ४९.खडाष्टक ५०.नवलपरी ५१.कळकळ ५३.वरुणी ५४.डाव ५५.जग ५६.जवस ६१.मधुकर ६३.जवान ६४.कलप ६५.विकास ६६.परत ६७.तनुज ६९.वळ ७०.नभ ७२.साप ७३.नड

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

न्यूज कॉलम

नाशकात पावसाची जोरदार हजेरी

नाशिक । मागील आठवड्यात नाशिक शहरासह जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला होता. तसेच या पावसामुळे शेतकऱ्यांना देखील काही प्रमाणात धीर मिळाला होता. मात्र त्यानंतर पावसाने दडी मारल्यामुळे शेतकरी चिंतेत सापडला होता. यानंतर पाऊस पुन्हा कधी कोसळणार याकडे सर्वांचे लक्ष्य लागले होते. त्यानंतर आज दुपारी ३ वाजेच्या सुमारास शहरातील काही भागांत तर पाच वाजेच्या सुमारास काही भागांत पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची एकच तारांबळ उडाल्याचे पाहायला मिळाले. शहरातील एमजी रोड, शालीमार, सीबीएस यासह आदी परिसरात पाच वाजेच्या सुमारास जोरदार पाऊस झाला.तर दुपारच्या सुमारास आंबेडकर नगर परिसरात पाऊस कोसळला. यामुळे नागरिकांचे चांगलेच हाल झाले. शहरातील काही भागांत ढगाळ वातावरण असल्याचे चित्र होते.

पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत - राजेंद्र गावित

नाशिक । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त नाशिक महानगर भाजपातर्फे सेवा पंधरवडा निमित्त आयोजित कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश भाजप उपाध्यक्ष व नाशिक महानगर व नाशिक ग्रामीण प्रभारी राजेंद्र गावित यांनी केले. ते नाशिक महानगर भाजपाच्या नूतन कार्यकारणीच्या व पदाधिकाऱ्यांच्या पहिल्याच बैठकीत बोलत होते.

भाजप नाशिक महानगराचे अध्यक्ष प्रशांत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवस निमित्ताने दि.१७ सप्टेंबर ते दि.२ ऑक्टोंबर या कालावधीत सेवा पंधरवड्याचे विविध सेवा कार्यक्रम होत आहेत.

बैठकीस भाजपा प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, लोकसभा समन्वयक गिरीश पालवे, नाशिक महानगर भाजपा उपाध्यक्ष पवन भगूरकर, नाशिक महानगर सरचिटणीस सुनील केदार, हिमगौरी आडके, रोहिणी नायडू, ड. श्याम बडोदे, काशिनाथ शिलेदार व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी प्रशांत जाधव यांनी या सेवा पंधरवड्यातील नियोजित कार्यक्रमांची माहिती देताना सांगितले की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व महाराष्ट्र प्रदेश कार्यालय प्रभारी रवि अनासपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली सेवा सप्ताहात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. जाधव यांनी सांगितले की, सेवा पंधरवड्यात युवा मोर्चातर्फे रक्तदान व आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर मोदी सरकार आणि राज्य सरकारच्या गोरगरिबांच्या कल्याणासाठीच्या योजनांची माहिती पोहोचवण्यासाठी वस्ती संपर्क अभियान राबविण्यात येणार आहे. त्याचबरोबर दि.२ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंतीनिमित्त व्यापक प्रमाणात स्वच्छतेचे उपक्रम हाती घेतले जाणार आहेत. देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात योगदान दिलेल्या महापुरूषांचे पुतळे तसेच परिसर स्वच्छ करण्याचे कार्यक्रमही होणार आहेत. आयुष्यमान भव सप्ताहानिमित्त गरजू जनतेकरिता आयुष्यमान कार्ड वाटप तसेच नोंदणी कार्यक्रमाचेही आयोजन केले जाणार आहे. या पंधरवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे व्यक्तिमत्व, विकासाची दृष्टी, धोरणे आणि त्यांना मिळालेले यश या विषयावरील प्रदर्शनीही आयोजित केली जाणार आहे, असे त्यांनी नमूद केले.

दि.२६ सप्टेंबर ते दि.१ ऑक्टोबर या काळात बूथ सशक्तिकरण अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याचा व्यापक पद्धतीने प्रारंभ करावा. दि.२५ सप्टेंबर रोजी पं.दीनदयाल उपाध्याय जयंती दिन असल्याने बूथ स्तरावरील कार्यक्रमांतर्गत विधानसभेतील प्रत्येक बुथवर पं.दीनदयाल यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या जीवनावर व्याख्यानाचे आयोजन करावे. दि.२ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती दिनानिमित्त आपापल्या परिसरातील विधानसभा क्षेत्रातील स्वातंत्र्य सेनानी व महापुरुषांच्या पुतळ्यांचे आवारातील परिसराची स्वच्छता करून सुशोभीकरण करावे करावे. या कार्यक्रमांमध्ये आमदार, खासदार व लोकप्रतिनिधींनी आपला सहभाग नोंदवावा असेही सुचित करण्यात आले.

यावेळी लक्ष्मण सावजी म्हणाले की, भारतीय जनता पार्टी हा पक्ष हा कार्यकर्त्यांच्या अथक मेहनत व अहोरात्र परिश्रमातून उभा राहिलेला पक्ष आहे. त्यामुळेच भारतीय जनता पार्टी हा जगातील सर्वात मोठा पक्ष आहे व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत देश विश्वगुरू म्हणून समजला जात आहे व लवकरच भारत जगातील नंबर एकची महासत्ता बनेल तो दिवस लांब नाही. यावेळी विजय साने, लोकसभा समन्वयक गिरीष पालवे, यांनीही नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन भाजपा नाशिक महानगर उपाध्यक्ष पवन भगूरकर यांनी केले. तर प्रास्ताविक सुनील केदार यांनी केले तर आभार हिमगौरी आडके यांनी मानले.

कुणाल वर्मा यांनी स्वरांतून दिली प्रेममयी जाणिवांची अलवार स्वरभेट

नाशिक । प्रतिनिधी

स्वरांचे माधुर्य , नजाकत व उपजत कोवळा स्वर यांचे गोंदण घेऊन सुर विश्वास ची मैफल छान रंगली.पावसाची रिमझिम आणि बनारसी शैलीतील आवाज यातून ईश्वर भक्तीची आस उपस्थितांनी अनुभवली.

नव्या पिढीतील कलाकारांच्या अविष्काराला हक्काचे व्यासपीठ देण्यासाठी 'सूर विश्वास' या अनोख्या मैफलीचे आयोजन करण्यात येते . त्यात कुणाल वर्मा (वाराणसी)यांचे गायन संपन्न झाले गौरव बॅनर्जी ,वाराणसी (तबला), पंकज रंगारी ,नागपूर (संवादिनी) यांची त्यांना साथसंगत लाभली तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले.

मैफिलीचे हे तिसावे पुष्प होते विश्वास ग्रुपचे कुटुंबप्रमुख विश्वास ठाकूर व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओच्या समन्वयक ऋचिता ठाकूर हे या उपक्रमाचे आयोजक असून संकल्पना विनायक रानडे यांची आहे. विश्वास गार्डन, ठाकूर रेसिडेन्सी, विश्वास को-ऑप. बँकेसमोर, सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. कुणाल यांनी मैफिलीची सुरुवात' राग शिवमत भैरव ' ने केली विलंबित एकतालात शब्द होते 'डार डार पाट.बंदिशितील शब्द, व स्वरसाज घेऊन शास्त्रीय गायनाच्या अनोख्या अनुभूतीचा प्रत्यय होता. त्यानंतर ईश्वरभक्ती , प्रेम यांची व्यापक जाणीव करून देणाऱ्या रचना सादर झाल्या , डिमिक डीमिक डमरू कर बाजे..या भजनानंतर हरी म्हणा,हरी म्हणा अभंग अध्यात्माची अनुभूती देणारा होता.मैफिलीचा समारोप 'अगा वैकुंठीचा राया 'या नाट्यपदाने झाला.कलाकारांचे सन्मान विश्वास ठाकूर, सी एल कुलकर्णी,प्रवीण मानकर, एन सी देशपांडे य विश्वास ज्ञान प्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिट्यूट चे अध्यक्ष डॉ .मनोज शिंपी यांचे हस्ते करण्यात आले.

चांदशी ज्येष्ठ नागरिक संघातर्फे सेवानिवृत्त अभियंत्यांचा सत्कार

नाशिक । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. एम.विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त अभियंता दिनाचे औचित्य साधून चांदशी येथील ज्येष्ठ नागरिक संघातर्फे संघाचे अध्यक्ष दत्तू सोनवणे, जगन्नाथ बोडके आणि बी.बी.मोरे या सेवानिवृत्त अभियंत्यांचा विजय बिरारी, प्राचार्य पी. एस. पवार आणि प्राचार्या ज्योत्स्ना जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

देशाच्या विकासात अभियंत्यांचे योगदान मोलाचे राहिले आहे. त्यामुळेच सेवाकाळात चांगली भूमिका बजावून आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या अभियंतांचा सत्कार करताना आम्हाला अभिमान वाटत आहे, असे एम.एन.पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात सांगितले. यावेळी सत्कारार्थी सेवानिवृत्त अभियंत्यांनी सेवा बजावताना त्यांना आलेले विविध अनुभव कथन केले.

कार्यक्रमास मोहन चंगेडे, प्रमोद चिकेरूर, अरुण कोरडे, रमेश आहेर, संभाजी शेवाळे, गणपतराव सोनवणे, अशोक सोनवणे, बाळासाहेब चालसे, शंकरराव खरात, किशोर देशमुख, प्रियदर्शन टांकसाळे, भगवान मोरे, एकनाथ शिरसाट आदी उपस्थित होते.

ई-पीक पाहणीच्या कालावधीत वाढ

नाशिक । वार्ताहर

केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे राज्यात खरीप हंगाम २०२३ पासून डिजिटल क्रॉप सर्व्हे प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येत आहे.त्यासाठी केंद्र शासनाचे सुचनांप्रमाणे राज्याच्या सध्या वापरण्यात येत असलेल्या ई-पीक पाहणी मोबईल प मध्ये अत्यावश्यक बाबींचा समावेश करून राज्याचे ई-पीक पाहणी मोबाईल प कस्टमाइज करण्यात आलेले आहे व या कस्टमाइज डिजीटल क्रॉप सर्व्हे मोबाईल प वापरुन खरीप हंगाम २०२३ मध्ये ऑगस्ट पासून डिजीटल क्रॉप सर्व्हे प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे.

डिजिटल क्रॉप सर्व्हे पायलट प्रकल्प शेतकरी स्तरवरील पीक पहाणीचा कालावधी दिनांक १ ऑगस्ट २०२३ ते १५ सप्टेंबर २०२३ (४५ दिवस) असा होता त्या कालावधीत १० दिवस मुदतवाढ देऊन दिनांक २५ सप्टेंबर २०२३ अशी अंतीम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने शेतकऱ्यांनी दिनांक २५ सप्टेंबर २०२३ या कालावधीमध्ये डिजीटल क्रॉप सर्व्हे पायलट मोबाइल प द्वारे ई-पीक पाहणी नोंदवावी असे आवाहन

एन.के. सुधांशु जमाबंदी आयुक्त व संचालक,भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांनी केले आहे

डॉ.वडगावकर कुटुंबीयांकडून माई लेले विद्यालयातील कर्णबधिर विद्यार्थ्यांना अनोखी भेट

नाशिक । प्रतिनिधी

नाशिकचे सुप्रसिद्ध डॉ. अतुल वडगावकर व डॉ. पूजा वडगावकर यांनी महाराष्ट्र समाज सेवा संघ संचालित श्रीमती माई लेले श्रवण विकास विद्यालयातील मुलांना अनोखी भेट दिली.

डॉ.अतुल वडगावकर यांचे सुपुत्र रोहन वडगावकर यांची चित्रकलेचे रंग बनवणारी विविवा इजी स्केच ही कंपनी आहे. हे उत्पादन १०० टक्के निर्यात केले जात असून विदेशात खूप प्रसिद्ध आहे.

या भेटीमागील भूमिका विषद करताना डॉ. अतुल वडगावकर म्हणाले की, कर्णबधिर विद्यार्थी हे दुसऱ्या अन्य कोणत्या तरी क्षेत्रात कुशल असतात. त्यांना प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मिळाले तर ते उत्तम कामगिरी करतात. याच विचारातून त्यांना हे पूर्ण निर्यात होणारे रंग भेट देण्याचा विचार आला. या रंगातून विद्यार्थी उत्तम चित्र रेखाटू शकतात. या चित्रातून उत्तम चित्रांना या कंपनीतर्फे परदेशातील चित्र प्रदर्शनात सहभागी होण्याची संधी देखील मिळू शकते.

याप्रसंगी स्नेहल मिलिंद पत्की, मुख्याध्यापक संतोष पाटील, विद्यार्थी, शाळेचे सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी व पालक उपस्थित होते.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर एमआयडीसी पोलीस चौकीत रिक्षाचालकांची बैठक

सिडको । प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या काळात सर्वत्र नागरिक घराबाहेर पडतात यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, वाहतूक कोंडीची समस्या उद्भवू नये, यासाठी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर एमआयडीसी चुंचाळे पोलीस चौकीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कारंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हद्दीतील रिक्षा चालकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत एमआयडीसी पोलीस चौकीच्या हद्दीतील दत्तनगर, कारगिल चौक, चुंचाळे शिवार, म्हाडा कॉलनी, गरवारे पॉईंट, अंबडगाव यासह विविध भागातील रिक्षा थांब्यावरील रिक्षाचालकांना बोलावण्यात आले होते. गणेश उत्सवात विविध मंडळे देखावे सादर करणार असल्याने वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी रिक्षा चालकांना सर्वप्रथम योग्य त्या सूचना देण्यात आल्या. रिक्षा चालकांनी युनिफॉर्म घालून रिक्षा चालवाव्यात, भर रस्त्यात वाहतूक कोंडी होणार नाही याची काळजी घ्यावी, बेशिस्तपणा केल्यास रिक्षा चालकांवर कारवाई होणार असा दमही पोलिसांनी या बैठकीत रिक्षा चालकांना दिला आहे. विशेष म्हणजे रिक्षा चालकांना पोलीस मित्र बनण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. एकीकडे मोबाईल चोरी, तसेच महिलांची छेडछाड होण्याच्या प्रकारात वाढ झाली आहे. संपूर्ण परिसरात गुन्हेगारी प्रवृत्तीचे गुंड दहशत माजवत आहे. परिसरातील नागरिकांना या गुंड प्रवृत्तीच्या लोकांमुळे धोका आहे. रिक्षा चालकांनी अशा गुंड, गुन्हेगारांची माहिती पोलिसांना दिल्यास गुन्हेगारीवर नियंत्रण मिळेल, असेही पोलीस निरीक्षक कारंडे यांनी रिक्षा चालकांना सांगितले.

सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये दुसरी कॅथलॅब लवकरच कार्यान्वित

दहा वर्षात ३०००० हृदय उपचारांसह शस्त्रक्रिया

नाशिक । प्रतिनिधी

अवघ्या दहा वर्षांच्या कालावधीमध्ये उत्तर महाराष्ट्राचे हक्काचे रुग्णालय ठरलेल्या सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने हृदयरोग उपचारांमध्ये अजून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. गेल्या दहा वर्षात हृदयाच्या सुमारे ३०००० हून अधिक प्रक्रिया आणि शस्त्रक्रिया करणाऱ्या सह्याद्री हॉस्पिटलमध्ये दुसरी कॅथलॅब लवकरच कार्यान्वित होत असल्याची माहिती हॉस्पिटलचे वरिष्ठ सहाय्यक उपाध्यक्ष संजय चावला यांनी दिली. दोन कॅथलॅब असणारे सह्याद्री हे उत्तर महाराष्ट्रातील पहिलेच रुग्णालय ठरले आहे.

हॉस्पिटल मधील हृदयरोग संबंधित तज्ञांच्या टीम मध्ये सर्जन म्हणून डॉ. राहुल कैचे व कार्डिओलॉजिस्ट म्हणून डॉ. आशुतोष साहू, डॉ. हिरालाल पवार व डॉ. प्रशांत पवार पूर्णवेळ सेवा देतात. सोबतच डॉ. श्रीपाल शहा, इंटरव्हेन्शनल न्यूरोलॉजिस्ट हे मेंदूच्या रक्तवाहिन्यांचे आजारांचे उपचार देखील कॅथलॅब मध्ये करतात.

हृदयविकाराचा झटका येऊन हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यानंतर अवघ्या काही मिनिटात प्रक्रिया सुरू होणारी 'डोअर टू निडल' व डोअर टू बलून या प्रणालींचे काटेकोरपणे पालन केल्यामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचले असल्याचे संजय चावला यांनी नमूद केले.कार्डिओलॉजिस्ट डॉ. आशुतोष साहू म्हणाले की, सह्याद्री हॉस्पिटल मध्ये अत्याधुनिक अशा आयव्हियूएस मशीन उपलब्ध असून हे हृदय रोग निदान करण्यासाठी अचूक मार्गदर्शक, सुरक्षित आणि खात्रीशीर माहिती देणारे नवीनतम तंत्रज्ञान आहे. दुसरी कॅथलॅब कार्यान्वित झाल्यानंतर अधिक प्रभावीपणे अजून असंख्य रुग्णावर उपचार करण्याचे शक्य असल्याचे मत कार्डिओलॉजिस्ट डॉ. हिरालाल पवार यांनी व्यक्त केले.

सौंदयीकरण करण्याबरोबर नदीचे शुध्दीकरण करणे आवश्यक

निशिकांत पगारे यांचे आवाहन

नाशिक । प्रतिनिधी

सौंदयीकरण करण्याबरोबर नदीचे शुध्दीकरण करणे आवश्यक आहे. असे आवाहन निशिकांत पगारे यांनी केले. नदी घाटी जन आंदोलन राष्ट्रीय समन्वय समितीचे 'नदीला निर्मळ राहू द्या, तिला अविरल वाहू द्या' यासाठी राष्ट्रीय संमेलन मध्यप्रदेशातील बडवाणी येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून निशिकांत पगारे हे बोलत होते.

संमेलनात भारतातील वीस राज्यातील जल, नदीप्रेमी उपस्थित होते. यावेळी भारतातील सर्व नद्यांचे संरक्षण व संवर्धन व्हावे यावर एकमत होवून त्यावर एक ठराव तयार करून तो राज्यसभेत पाठवावा. तसेच लोकांमध्ये नदीविषयी आत्मीयता प्रेम वाढावे यासाठी 'एक देश एक कायदा नदी साठी मोठे-मोठे बंधारे घातक' नद्यांमध्ये होणारे प्रदूषण, अतिक्रमण, काँक्रीटीकरण आदी विषयावर चर्चा झाली.

नद्या वाचवण्याबद्दल कोणतेही थेट कायदे व कायदेशीर बंधने नाहीत याबद्दल नद्यांच्या संरक्षण व संवर्धनासाठी विधेयक असणे आवश्यक आहे. त्यासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांनी बडवानी मध्यप्रदेश येथे राष्ट्रीय नदी परिषदेचे आयोजन करण्यात केले होते. गोदावरी नदीत व उपनद्यांमध्ये नाल्यांच्या माध्यमातून सोडलेले सांडपाणी, गोदावरी नदी व उपनद्यामध्ये टाकलेल्या सिमेंटमुळे नदीला प्रवाहित राहण्यासाठी अडथळा निर्माण होत असून गोदावरी सारखीच संपूर्ण भारतात हीच परिस्थिती असल्याने आता संघर्ष करण्यास सर्वांनी संघटित व्हावे, गोदावरीच्या उपनद्या व त्याला मिळणारे नैसर्गिक नाले याच्याही सुरक्षा व संवर्धनाच्या कामाला गती येणे आवश्यक आहे, विकास करीत असताना नद्यांच्या सौंदयीकरण करण्याबरोबर नदीचे शुध्दीकरण करणे आवश्यक आहे. असे आवाहन महाराष्ट्राचे प्रतिनिधी निशिकांत पगारे यांनी केले.

संमेलनात नदी संरक्षण, सुरक्षा आणि पूनरुजीवन अधिनियम विधेयक पारित करण्यात आले. या संमेलनात सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ वकील संजय पारीख, खा. अनिल हेगडे, खा. देवप्रसाद रॉय, ओरिसाच्या प्रफुल्ल सामंतरा, मध्य प्रदेशचे सूनीलम, आराधना भार्गव, अमृतासिंग गुजरातचे शेतकरी नेते नारायण गडवी, भरतसिंग झाला, केरळचे सी. आर. नीलकंदन, बिहारचे महेंद्र यादव, महाराष्ट्रातून निशिकांत पगारे व योगेश बर्वे यांच्यासह देशभरातील वीस राज्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मोदींच्या वाढदिवसानिमित्त भाजपा दिव्यांग विकास आघाडीतर्फे फळ वाटप

नाशिक । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा दिव्यांग विकास आघाडीच्या वतीने फळं वाटप करण्यात आले. यावेळी सर्व दिव्यांग बांधवांनी मोदींना दीर्घायुष्य लाभो अशी प्रार्थना केली. याप्रसंगी न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा यमुना घुगे घुगे, राहुल वाजे, महादू घुगे, भास्कर गांगुर्डे, अशोक निकम, डॉ. देशमुख यांनी मोदींना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रमाचे आयोजन बाळासाहेब घुगे यांनी केले होते.

न्यूज कॉलम

मागील भांडणाच्या कारणातून महिलेचा विनयभंग

धुळे । बिलाडी गावात मागील भांडणाच्या कारणावरुन २५ वर्षीय महिलेला मारहाण करुन विनयभंग करण्यात आला. तसेच पीडितेचा पती व सासरे यांना मारहाण करण्यात आली. या प्रकरणी पिडीतेच्या तक्रारीवरुन किशोर नाना पवार, सुमनबाई नाना पवार, योगेश नाना पवार, संजय उखा अहिरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिवसेनेच्या शाखांचे शिरपूर येथे उद्घाटन

शिरपूर। येथील शिवसेनेच्या ठाकरे गटातर्फे बभळाज व नागेश्वर येथे नूतन शाखांचे उद्घाटन करण्यात आले. विधानसभा संपर्क प्रमुख रवींद्र धनावडे यांच्या हस्ते शाखांचे उद्घाटन झाले. यावेळी उपजिल्हा प्रमुख भरतसिंह राजपूत, जोगराना, छोटूसिंह राजपुत, अत्तरसिंह पावरा, योगेश सूर्यवंशी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

सजली बाजारपेठ : हरतालिका व्रताची तयारी, घरोघरी केली जाणार पूजा

मूर्ती, फळे, फुले खरेदीस महिलांचा उत्साह

धुळे । प्रतिनिधी

मनपसंद पती मिळावा, तसेच अखंड सौभाग्य लाभावे, यासाठी कुमारिका व सुवासिनी हरतालिकेची व्रत मनोभावे करतात. या पूजेसाठी लागणारे साहित्य तसेच सजावटीसाठीचे साहित्य खरेदीसाठी रविवारी बाजारपेठेत महिलांची गर्दी दिसत होती. हरितालिका पूजा आज असून,बाजारपेठेत हरतालिकेची मूर्ती, पाच फळ, पत्री, फळ, फुले याची खरेदी उत्साहात होत होती. जागो जागी हरतालिकेच्या आकर्षक अशा मूर्ती आणल्या आहेत. पूजेसाठी यंदा वाळू उपलब्ध न झाल्यामुळे काहीनी वाळूच्या पाकिटे बनवली आहेत. विविध प्रकारच्या फळांची व फुलांची बाजारात मागणी आहे.

गणेश प्रतिष्ठापनेच्या आदल्या दिवशी हरतालिकेची पूजा केली जाते. आज हरतालिकेची पूजा असल्याने रविवारी बाजारपेठेत लोकांची गर्दी झाली होती. बाजारात दिवसभर पूजा साहित्यांच्या खरेदीसाठी वर्दळ होती. विक्रेत्यांनी बाजारपेठेत हरतालिकेच्या आकर्षक मूर्ती आणल्या आहेत. या पूजेच्या वेळी वाळूची शंकराची पिंड करतात. अलीकडे वाळू पटकन उपलब्ध होत नसल्याने विक्रेत्यांनी वाळूची पाकिटेही विकायला सुरुवात केली आहे. हरतालिकेची मूर्ती, पत्री, वाळू आणि पूजा साहित्य असे एकत्र पॅकेजही दुकानदारांनी उपलब्ध केले आहे.

हरतालिकेसाठी लागणारे साहित्य

हरतालिकेच्या पुजेसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या झाडांची अकरा पाने, पाच वेगवेगळी फळे, फुले, महादेवाची पिंड बनवण्याकरता वाळू, सौभाग्याचे अलंकार, वस्त्रमाळ, ओटीची पुडी, तुपाचे निरांजन, पंचामृत, शुद्ध पाणी आदी साहित्यांचा वापर पूजा करण्याकरता केला जातो. हे साहित्य खरेदी करण्यासाठी महिलांनी गर्दी केली.

अखंड सौभाग्यासाठी व्रत

माता पार्वतीने भगवान शंकराशी लग्न करण्यासाठी हे व्रत केले होते. अखंड सौभाग्य राहावे यासाठी हरतालिकेचे व्रत केले जाते. इतकेच नाही तर इच्छेनुसार पती मिळावा, यासाठी मुलीही या व्रत करतात. हरतालिका व्रत सर्व पाप व कौटुंबिक चिंतांना दूर करणार आहे. या दिवशी वाळूने शिवलिंग तयार करून त्याची पूजा केली जाते.

प्रदूषण विरहित अद्यावत वाहन दुरुस्तीबाबत सराव प्रशिक्षण

टू व्हीलर मेकॅनिक फेडरेशनतर्फे आयोजन

धुळे । प्रतिनिधी

टू व्हीलर गॅरेज ओनर्स & मेकॅनिक फेडरेशन
टू व्हीलर मेकॅनिक असोसिएशन
प्रॅक्टीकल डेमो
फॉल्ट फाईंडींग
प्रॅक्टीकल डेमो
BS 6
Niterra India

प्रदूषण विरहित अद्यावत वाहनांचे दुरुस्तीबाबत नाशिक येथे गॅरेज व्यावसायिकांचे सराव प्रशिक्षण नुकतेच झाले. बीएस-६, ईएफआय फॉल्ट फाइंडिंग संदर्भात यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

नाशिकसह धुळे, अहमदनगर, खेड (जि. रत्नागिरी), नांदगाव येथील बहुसंख्य मेकॅनिक सहभागी झाले. प्रशिक्षक जाधव, सहाय्यक प्रशिक्षक उमेश पंडित, फेडरेशनचे अध्यक्ष राजेंद्र घुले यांनी प्रत्येक विषयावर माहिती दिली. टू व्हीलर मेकॅनिक असोसिएशन उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष अजय साळुंखे, धुळे जिल्हाध्यक्ष मुकूंद कुळकर्णी, उपाध्यक्ष मुक्तार शेख यांनीही येणाऱ्या अडचणी व कामाबाबत मार्गदर्शन केले. चार बॅचेसमध्ये ३२० मेकॅनिक यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. सखोल माहीती देत गॅरेज कामाचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्यामुळे गाडीचे काम करण्याचा आत्मविश्वास वाढला. बीएस ६ एफआयचे सेंसर व ऍक्चुवेटर फ्युएल यंत्राचा दाब कसा तपासावा, याची माहिती झाली. मल्टीमीटर आणि स्कॅनरने वाहनातील बिघाड कसे शोधावे, तपासावे याचेही दिखविले, स्कॅनरचा वापर कसा करावा याची माहिती दिली.

अध्यक्ष साळुंखे यांनी सांगितले, की अद्यावत प्रदूषण विरहित वाहन दुरुस्तीची योग्य माहीती असल्यास व्यावसायिकालाही त्याची दुरुस्ती नेमकी करता येईल. त्यामुळे वाहनही व्यवस्थित आणि सुरक्षित राहील. प्रशिक्षणात उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. प्रशिक्षणात विशेष सहभागाबद्दल विभागीय अध्यक्ष अजय साळुंखे, जिल्हाध्यक्ष मुकूंद कुळकर्णी, उपाध्यक्ष मुक्तार शेख यांना सन्मानपत्र देण्यात आले. फेडरेशनचे उपाध्यक्ष संतोष पवार, लोंढे, सरचिटणीस सुनील इंगळे यांनी परिश्रम घेतले.

लायन्स क्लब धुळे आणि शिरपूर पीपल्स बँक तर्फे भव्य गणेश आरास स्पर्धा

धुळे । प्रतिनिधी

लायन्स क्लब धुळे आणि शिरपूर पिपल्स को ऑप बँक ली धुळे तर्फे यंदाही भव्य गणेश आरास स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे या स्पर्धेमध्ये सजीव आणि देखावा असलेल्या सर्व मंडळांना भाग घेता येणार आहे.

देखाव्यामार्फत समाजात प्रबोधन होणे, एखादी कृती थांबवण्याकरता जनजागृती, गणेश मूर्ती, भक्तांसाठी सुविधा, देखावा या सगळ्या गोष्टींचा विचार देखाव्याचे परीक्षण करताना केला जाईल. नियुक्त केलेले परीक्षक प्रत्येक देखाव्याला भेट देऊन वरील सर्व गोष्टींची पहाणी करणार आहेत. स्पर्धेच्या निकालांमध्ये प्रथम द्वितीय तृतीय आणि दोन उत्तेजनार्थ अशी बक्षिसे असतील पारितोषिकांचे स्वरूप रोख आणि स्मृतिचिन्ह असं असेल पारितोषिक वितरण समारंभ १५ ऑक्टोंबर २०२३ ला गिंदोडिया मैदान धुळे येथे करण्यात येईल. नाव नोंदणी मोफ़त आहे परंतु नोंदणी करणार्या गणेश मंडळाचेच परीक्षण केले जाणार आहे तरी सर्व गणेश मंडळ आणि भक्तांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आपल्या मंडळाची नोंदणी खालील सदस्यांना संपर्क साधून १८ सप्टेंबर २०२३ पर्यंत करावी. अश्विन दाते ९८२२३०८४९७ श्रीहरी अहिरे ९५४५६४४१४४ असे आवाहन लायन्स क्लब धुळे व शिरपूर पिपल्स को ऑप बँकेच्या वतीने करण्यात आले आहे.

विद्यार्थिनींची कुस्ती स्पर्धेसाठी निवड

शिरपूर । शहरातील एच. आर. पटेल कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींची विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हा क्रीडा संकुल धुळे येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत १७ वर्षे वयोगटातील ५३ किलो वजन गटात योगिता माळी व १९ वर्षे वयोगटातील ५० किलो वजन गटात प्रतिक्षा चौधरी हिने विजेतेपद मिळविले. दोन्ही खेळाडूंची विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवशी जिल्ह्यात विविध समाजोपयोगी उपक्रम

धुळे । प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हयात विविध समजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. साक्री,शिंदखेडा,धुळे शहर,धुळे तालुका,शिरपुर येथे कार्यक्रम होणार आहेत.

आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन काँग्रेस कार्यकर्त्यांनी जिल्हयात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. आज दि.१८ सप्टेंबर रोजी साक्री ग्रामीण रुग्णालयात बेबी किट व फळवाटपाचा कार्यक्रम होत आहे. साक्री शहर काँग्रेस अध्यक्ष प्रज्योत देसले,साक्री बाजार समितीचे संचालक दिपक साळुंके,प्रा.मुकेश पाटील यांनी सदर कार्यक्रम आयोजित केला आहे. तर धनुर ता.धुळे येथे ग्रामपंचायत सरपंच चेतन शिंदे यांच्यावतीने भव्य निबंध स्पर्धा घेण्यात येत आहे. तसेच अमळनेर येथे जय योगेश्वर माध्यमिक विद्यालयात भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले आहे. धुळे जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष के.डी.पाटील,अमळनेर तालुका काँग्रेस कमिटी,अमळनेर महिला काँग्रेस कमिटी आणि युवक काँग्रेसच्यावतीने रक्तदान शिबीर घेण्यात येत आहे.त्याचप्रमाणे धुळे शहरातील काँग्रेस भवनात आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने कार्यकर्ते केक कापून वाढदिवस साजरा करणार असल्याचे शहर काँग्रेसचे भिवसन अहिरे,हरीभाऊ चौधरी,सेवादलाचे अध्यक्ष राजेंद्र खैरनार यांनी कळविले आहे.

International Ozone Day

ओझोनचे संरक्षण करणे ही काळाची गरज : प्रा.डॉ.अहिरे

दहिवेल । प्रतिनिधी

येथील उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात जागतिक ओझोन दिवस साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक बाबासाहेब सत्यजित पाटील व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ एस बी देसले होते.

प्रमुख पाहुणे प्रा डॉ विजय भामरे होते त्यांनी ओझोन चे जागतिक तापमानावर होणारे परिणाम विषयी माहिती दिली तर प्रा डॉ सुरेश अहिरे यांनी स्लाईड शो द्वारे विद्यार्थ्यांना ओझन थर कसा व कुठे असतो तसेच त्याचे मानवी आरोग्य व जीवसृष्टीवर होणारे परिणाम गंभीर असून ओझोनचे संरक्षण करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा शिवप्रसाद शेवाळे यांनी केले.कार्यक्रमाला प्रा डॉ आर व्ही कारंडे,प्रा डॉ श्रीमती वंदना पाटील,प्रा आय यु शेख व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते आभार प्रा डॉ एस एस भोई यांनी मानले.

सामोडे कन्या विद्यालयात पर्यावरण पूरक गणपती कार्यशाळा संपन्न

कन्या विद्यालय
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती
देवगीरी संभाग, महाराष्ट्र प्रांत:
पिंपळनेर ता साक्री जि धुळे

सामोडे । प्रतिनिधी

कन्या विद्यालय सामोडे व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती पिंपळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत एकूण १०० विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सहभाग घेतला.

शाडू मातीपासून गणपती मूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण यात देण्यात आले. पिंपळनेर येथील कलाशिक प्रमोद गांगुर्डे व योगेश भामरे यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. कन्या विद्यालयातील लहान मुलांनी मूर्ती निर्मितीचा आंनद घेतला. अनेकांनी सुबक मुर्ती बनवल्या. येणाऱ्या गणेशोत्सवात ह्याच मूर्त्यांची स्थापना आपापल्या घरी करू असा विद्यार्थ्यांनी संकल्प केला. प्लास्टर ऑफ परिसच्या मूर्त्यांमुळे पर्यावरणाला हानी पोहचते म्हणून पर्यावरण पूरक गणेश मूर्त्यांची स्थापना होणे गरजेचे आहे असे जनकल्याण समितीचे सदस्य माधव पवार यांनी म्हटले.

जयदया शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अनिल दयाराम शिंदे व कन्या विद्यालय शाळेच्या मुख्याध्यापिका मनीषा शिंदे, प्रभाकर घरटे यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना सहभागाबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक विल्सन दास, संजय देसाई, कुणाल बेनुस्कर, जितेंद्र सगर, नंदलाल शिंदे कलाशिक्षक, आणि जनकल्याण समितीच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

OPPO Reno10 Pro 5G

चंद्रकांतदादा मोरे यांची महापौर दालनास भेट

धुळे । प्रतिनिधी

श्री स्वामी समर्थ सेवा अध्यात्मिक विकास केंद्र, दिंडोरीचे सद्गुरु मोरे दादा यांचे नातू चंद्रकांत दादा मोरे यांनी काल महापौर प्रतिभा चौधरी यांच्या दालनास भेट दिली. यावेळी चौधरी परिवाराच्यावतीने त्यांचे औक्षण करण्यात आले. तसेच महापौरांनी पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. तसेच श्री द्वारकाधीश प्रतिष्ठानच्यावतीने अमोल मासुळे यांनीही गुरुमाऊली यांना श्रीकृष्ण यांची प्रतिमा भेट दिली.

अविस्मरणीय भेटीदरम्यान मोरे दादांनी धुळे महानगरपालिकेची जास्तीत जास्त भरभराट होवो. तसेच जनतेची चांगली सेवा घडो; असा आशीर्वाद दिला. याप्रसंगी महापौर प्रतिभा चौधरी, आयुक्त अमिता दगडे-पाटील, माजी महापौर चंद्रकांत सोनार, माजी महापौर जयश्री आहिरराव, सभागृह नेत्या भारती माळी,

माजी स्थायी समिती सभापती सुनिल बैसाणे, नगरसेविका मंगला पाटील, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अमोल चौधरी, प्रा.सागर चौधरी यांचेसह भाजपाचे इतर पदाधिकारी व मनपाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

हस्ती स्कूल तर्फे ' माझा बाप्पा... माझ्या कलेतून'... कार्यशाळा संपन्न

दोंडाईचा । प्रतिनिधी

हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज दोंडाईचा तर्फे शाळेचे मुख्य कार्यालय काराणी ज्ञानदीप येथे शालेय समिती चेअरमन कैलास जैन यांचे मार्गदर्शनाने श्रीगणेश उत्सव पार्श्वभूमिवर शाडू माती पासून श्रीबाप्पांची इको फ्रेण्डली मूर्ति साकारणे ' माझा बाप्पा माझ्या कलेतून ' या कार्यशाळेचे आयोजन दि. १० सप्टेंबर २०२३ रविवार रोजी करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा. त्यांनी शाडू माती किंवा काळ्या मातीपासून सुबक, सुंदर व मनोहारी इको फ्रेण्डली श्रीबाप्पांची मूर्ति साकारावी, आणि आपल्या घरी स्वत: तयार केलेल्या मूर्तिची प्रतिष्ठापना करून मूर्तिचे विसर्जनही घरीच करावे; तसेच पर्यावरण संवर्धन बाबत जाणीवा निर्माण होऊन प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे जल प्रदूषण थांबवावे; ह्या उद्देशाने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदरच्या कार्यशाळेत हस्तीचे कला शिक्षक मनोहर यादव यांनी विद्यार्थ्यांना शाडू पासून मूर्ती कशी तयार करावी ? मातीचा गोळा बनविण्यासाठी पाणी किती प्रमाणात घ्यावे ? ओल्या मातीचा गोळा किती व केवढा गोळा घ्यावा ? या गोळ्यांना श्री गणेशाचे हात, पाय, सोंड, दात, मुकुट तसेच पोट, पितांबर, शेला, गणेशाचे अलंकार यांना कसा आकार द्यावा ? याविषयी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. तसेच श्री गणेश मूर्ति सुकल्यावर मूर्तिला सुंदर व आकर्षक आणि मनोहारी रूप साकार करण्यासाठी कोणता रंग कसा वापरावा ? रंग लेपन कसे करावे ? रंगसंगती कशी असावी ? याविषयीही मार्गदर्शन करण्यात आले. सोबतच श्रीगणेश चतुर्थीला आपल्या घरी स्वत: तयार केलेल्या या श्रीबाप्पांच्या इको फ्रेण्डली मूर्तिची स्थापना करावी; व मूर्तिचे विसर्जनही घरीच बादलीत अथवा टबमध्ये पाणी घेऊन करावे. याबाबतही आवाहन करण्यात आले. या कार्यशाळेत इ. १ ली. ते इ. १० वी चे बहुसंख्य विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. सहभागी सर्व विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत मार्गदर्शनानुसार शाडू माती व काळ्या माती पासून स्वत: इको फ्रेण्डली श्री बाप्पांच्या सुबक व सुंदर गणेश मूर्ति आनंदाने साकारल्या. वरील इको फ्रेण्डली श्रीबाप्पांची मूर्ति साकारणे कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी कला विभाग प्रमुख मनोहर यादव, माधुरी गोसावी यांनी परिश्रम घेतले.

हस्ती स्कूल येथे दरवर्षी नियमितपणे अशा स्वरूपाच्या कार्यशाळांचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी केले जाते. याद्वारा विद्यार्थ्यांमधील सुप्त कला गुणांना व सृजनशीलता, नवनिर्मितीला चालना मिळते. सोबतच त्यांचेवर पर्यावरण संवर्धन जाणीवांचे संस्कार रूजविले जातात. यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासास साहाय्य होते.

लायन्स क्लब आणि शिरपूर पीपल्स बँक तर्फे गणेश आरास स्पर्धा

धुळे । प्रतिनिधी

लायन्स क्लब धुळे आणि शिरपूर पिपल्स को ऑप बँक ली धुळे तर्फे यंदाही भव्य गणेश आरास स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे या स्पर्धेमध्ये सजीव आणि देखावा असलेल्या सर्व मंडळांना भाग घेता येणार आहे.

देखाव्यामार्फत समाजात प्रबोधन होणे, एखादी कृती थांबवण्याकरता जनजागृती, गणेश मूर्ती, भक्तांसाठी सुविधा, देखावा या सगळ्या गोष्टींचा विचार देखाव्याचे परीक्षण करताना केला जाईल. नियुक्त केलेले परीक्षक प्रत्येक देखाव्याला भेट देऊन वरील सर्व गोष्टींची पहाणी करणार आहेत. स्पर्धेच्या निकालांमध्ये प्रथम द्वितीय तृतीय आणि दोन उत्तेजनार्थ अशी बक्षिसे असतील पारितोषिकांचे स्वरूप रोख आणि स्मृतिचिन्ह असं असेल पारितोषिक वितरण समारंभ १५ ऑक्टोंबर २०२३ ला गिंदोडिया मैदान धुळे येथे करण्यात येईल. नाव नोंदणी मोफ़त आहे परंतु नोंदणी करणार्या गणेश मंडळाचेच परीक्षण केले जाणार आहे तरी सर्व गणेश मंडळ आणि भक्तांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आपल्या मंडळाची नोंदणी खालील सदस्यांना संपर्क साधून १८ सप्टेंबर २०२३ पर्यंत करावी. अश्विन दाते ९८२२३०८४९७ श्रीहरी अहिरे ९५४५६४४१४४ असे आवाहन लायन्स क्लब धुळे व शिरपूर पिपल्स को ऑप बँकेच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

हरतालिकेनिमित्त बाजारात महिलांमध्ये खरेदीचा उत्साह

विवाहित महिला करतात व्रत पूजन

धुळे। मनपसंद पती मिळावा, तसेच अखंड सौभाग्य लाभावे, यासाठी कुमारिका व सुवासिनी हरतालिकेची व्रत मनोभावे करतात. या पूजेसाठी लागणारे साहित्य तसेच सजावटीसाठीचे साहित्य खरेदीसाठी रविवारी बाजारपेठेत महिलांची गर्दी दिसत होती. हरितालिका पूजा आज असून,बाजारपेठेत हरतालिकेची मूर्ती, पाच फळ, पत्री, फळ, फुले याची खरेदी उत्साहात होत होती. जागो जागी हरतालिकेच्या आकर्षक अशा मूर्ती आणल्या आहेत. पूजेसाठी यंदा वाळू उपलब्ध न झाल्यामुळे काहीनी वाळूच्या पाकिटे बनवली आहेत. विविध प्रकारच्या फळांची व फुलांची बाजारात मागणी आहे. गणेश प्रतिष्ठापनेच्या आदल्या दिवशी हरतालिकेची पूजा केली जाते. आज हरतालिकेची पूजा असल्याने रविवारी बाजारपेठेत लोकांची गर्दी झाली होती. बाजारात दिवसभर पूजा साहित्यांच्या खरेदीसाठी वर्दळ होती. विक्रेत्यांनी बाजारपेठेत हरतालिकेच्या आकर्षक मूर्ती आणल्या आहेत. या पूजेच्या वेळी वाळूची शंकराची पिंड करतात. अलीकडे वाळू पटकन उपलब्ध होत नसल्याने विक्रेत्यांनी वाळूची पाकिटेही विकायला सुरुवात केली आहे. हरतालिकेची मूर्ती, पत्री, वाळू आणि पूजा साहित्य असे एकत्र पॅकेजही दुकानदारांनी उपलब्ध केले आहे. हरतालिकेच्या पुजेसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या झाडांची अकरा पाने, पाच वेगवेगळी फळे, फुले, महादेवाची पिंड बनवण्याकरता वाळू, सौभाग्याचे अलंकार, वस्त्रमाळ, ओटीची पुडी, तुपाचे निरांजन, पंचामृत, शुद्ध पाणी आदी साहित्यांचा वापर पूजा करण्याकरता केला जातो. हे साहित्य खरेदी करण्यासाठी महिलांनी गर्दी केली.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

पीएम स्कील रन मॅरेथॉन स्पर्धा धुळ्यात उत्साहात संपन्न

भरपावासात झाली पीएम स्कील रन : ७०० स्पर्धकांचा सहभाग

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धुळे

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धुळे

धुळे । व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,धुळे यांच्यावतीने धुळे शहरातील शासकीय, खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तसेच शासकीय तांत्रिक विद्यालयामध्ये प्रशिक्षण संस्थेमार्फत आयोजित पीएम स्कील रन मॅरेथॉन स्पर्धा आज उत्साहात संपन्न झाली. या मॅरेथॉन स्पर्धेस अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य रा.सु.मानकर, उपप्राचार्य आर.पी.पगारे, स्टेट बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर सेलान अहिरराव, रोटरी क्लबचे प्रथमेश गांधी, उद्योजक कुचेरीया, सामाजिक कार्यकर्ते अनुप अग्रवाल तसेच विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी तसेच युवक, युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी मान्यवराच्या हस्ते पीएम स्कील रॅलीस हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेस सुरवात केली. ही मॅरेथॉन स्पर्धा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धुळे येथून सुरु झाली त्यानंतर सावित्रीबाई फुले पुतळा- वीर सावकर पुतळा-अग्रवाल भवन- कमलाबाई हायस्कुल- शासकीय तांत्रिक विद्यालय,जिल्हा कारागृह, धुळे परत शासकीय तांत्रिक विद्यालय, कमलाबाई हायस्कुल- अग्रवाल भवन- वीर सावकर पुतळा- सावित्रीबाई फुले पुतळा मार्गे औद्योगिक प्रशिक्षण संस्था,धुळे या मार्गावरुन काढण्यात आली. या मॅरेथॉन स्पर्धेत शासकीय, खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच गंगामाई औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगाव, तिरुपती औद्योगिक प्रशिक्षण संस्था,धुळे तसेच आयटीआयमधील जवळपास ७०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या मॅरेथॉन स्पर्धेत पुरुष गटात प्रथम सोपान खांडेकर, द्वितीय सागर वाघमोडे, राहुल पाटील, तर महिला गटात राणी पाटील, निकिता चौधरी, भूमिका डोंगरे विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक, प्रमाणपत्र व पदक देवून गौरविण्यात आले. स्पर्धा यशस्वीतेसाठी प्रबंधक आर.आर.सोनवणे, समन्वयक गट निदेशक सुरेंद्र इंगळे, सातपुते तसेच सर्व गटनिदेशक, शिल्पनिदेशक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

संकलन : दिपक वाघ